दै. गोदातीर दि. ०८/०७/२५



# पिस्तूलचा धाक दाखवून चैन स्नॅचिंग, घरफोडी आणि दुचाकी चोरी करणारी आंतरराज्य टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

## सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त- एसपी अबिनाश कुमार यांची माहिती



नांदेड (प्रतिनिधी) - विनापरवाना बेकायदेशीररित्या पिस्तूल वापरून वेळप्रसंगी धाक दाखवून चैन स्नॅचिंग, घरफोडी, दुचाकी चोरी करणारी आंतरराज्य टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकली. पोलिसांनी सात जणांना वेगवेगळ्या ठिकाणाहून अटक करून त्यांच्याकडून सहा लाख ६९ हजार ६९७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी यावेळी चार पिस्तूल, सात जिवंत काडतूस, दोन दुचाकी आणि सोन्याचे दागिने असा म द्देमालामध्ये समावेश असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी नांदेड, हिंगोली जिल्हा आणि शेजारील तेलंगणा राज्यामध्ये घरफोडी, चैन स्नॅचिंग, दुचाकी चोरीच्या गुन्हे करून पोलिसांना चकमा देणाऱ्या टोळीला अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी वेगवेगळ्या टीममार्फत या टोळीची मुस्कटदाबी केली.

अटक करण्यात आलेल्या टोळीतील अमान उर्फ अम्या किशोर जोगदंड (वय २१ रा.र खोब्रागडेनगर नांदेड), राहुल उर्फ हीपहाप माणिक लिंगायत (वय २३, रा. जिल्हा परिषद शाळेच्या मागे भोकर), म हेम्मद अख्ताब उर्फ अदू अब्दुल कदिर (वय २१, रा. दिवानी बावडी इतवारा ह. मु. मुदखेड), शेख मोबीन शेख गौस (वय २५, रा. खुदबेनगर नांदेड), संजय उर्फ संजू दत्ता गुंडेवार (वय ३०, रा. नंदिग्राम सोसायटी नांदेड), रोहित नरेंद्र ताटीपामुलवार (वय २१, रा. भावेश्वर नगर चौफाळा), राहुल चंद्रकांत राव (वय २५, रा. आंबेडकरनगर भोकर) या गुन्हेगारांना अटक केली. त्यांच्याकडून सहा सोन्याचे गंठण, नगदी १५ हजार ५०० रुपये, विविध कंपनीच्या दोन दुचाकी, चार पिस्तूल, एक मॅक्झिन, सात जिवंत काडतूस असा सहा लाख ८९ हजार ६९७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांविरुद्ध नांदेड शहरातील भाग्यनगर, विमानतळ, शिवाजीनगर या ठिकाणी दहा गुन्हे तर वसमत जिल्हा हिंगोली येथे एक गुन्हा आणि तेलंगणा राज्यातील मुधोळ, बासर, तनुर (जि. निर्मल) येथे प्रत्येकी एक आणि बोधन येथे एक अशा प्रकारचे १४ गुन्हे उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आल्याचे अबिनाश कुमार यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपाधीक्षक प्रशिक्षणार्थी किरण पोपळघाट, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, साईनाथ पुयड, महेश कोरे यांची उपस्थिती होती.